F/GAD1/Aadesh - Pariptrak/663

"सुधारीत आदेश"

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/15960/2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक :- 23.02.2017

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत सहाय्यक जनमाहिती अधिकारी /जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.**

**संदर्भ :- 1) कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/9325/15 दि.19.10.2015**
**2) कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/12109/15 दि.17.12.2015**

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्र.01 व 02 च्या आदेशान्वये केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत विविध विभागाची माहिती देण्यासाठी सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांचे नियुक्तीबाबत आदेश निर्गमीत करण्यात आला असुन, सार्वजनिक बांधकाम विभाग व लेखा विभाग मनपा नांदेड या विभागात प्राप्त होणा-या माहितीच्या अधिकार अर्जावर निर्णय घेण्यासाठी **खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती.**

| अ.क्र. | विभागाचे नांव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन शाखा | कार्यालय अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक | सहाय्यक आयुक्त | कार्यकारी अभियंता |
| 2 | लेखा विभाग | कार्यालय अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक | मुख्य लेखाधिकारी | उपआयुक्त(महसुल) |

तथापि प्रशासकीय कारणास्तव उपरोक्त विवरणातील नियुक्त अपिलीय अधिकारी आदेशात अंशतः बदल करणे अपेक्षित असल्यामुळे, संदर्भ क्र.01 व 02 च्या आदेशामध्ये मर्यादीत अंशतः बदल करुन खालीलप्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिका-यांची नियुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन शाखा | कार्यालय अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक | उपअभियंता, बांधकाम विभाग | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग |
| 2 | लेखा विभाग | कार्यालय अधिक्षक तथा वरिष्ठ लिपीक | सहाय्यक आयुक्त, लेखा विभाग | मुख्यलेखाधिकारी |

करिता वरीलप्रमाणे झालेल्या अंशतः बदलांची नोंद सबंधित विभागप्रमुखांनी घ्यावी, तसेच इतर नियम, अटी व शर्ती पुर्वीच्याच आदेशाप्रमाणे लागु राहतील.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ परिणामाने व्हावी.

**(स्थळ प्रतिवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरीत/-
आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर —
मा.उपसचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद

प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तवः
1) संबंधित सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी, मनपा नांदेड
2) भांडार अधिक्षक, मनपा नांदेड यांना देऊन आदेशित करण्यात येते की, सदर आदेशानुसार झालेल्या अंशतः बदलाची नोंद बॅनर बनवितांना घ्यावी.
3) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, मनपा नांदेड यांना सुचित क्ररण्यात येते की, सदर आदेशातील अंशतः बदलाची नोंद मनपा संकेतस्थळावर घेण्यात यावी.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
करिता/-